स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26**
दिनांक ३०/०१/२०२६

**वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार यांचे दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी पहाटे विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाले. महाराष्ट्र राज्याच्या राजकारणासोबतच प्रशासकीय कार्यात त्यांचा मोठा प्रभाव होता, त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे.
आज दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी दिवंगत अजितदादा पवार यांना वसई विरार शहर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी अजितदादा पवार यांच्या जीवनपटाची माहिती देऊन त्यांच्या एकूण राजकीय, सामाजिक व प्रशासकीय कार्यांची माहिती सांगत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. मा.अतिरिक्त आयुक्त श्री. दिपक सावंत यांनीही अजितदादांनी केलेल्या विविध कामांचा संदर्भ देत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी(भा.प्र.से.) यांनी अजितदादांसोबत विविध प्रशासकीय कामासंदर्भात आलेले अनुभव यावेळी सांगितले. अतिशय हुशार, वक्तशीर, कार्यतत्पर, सदैव लोकहिताची कामे करण्यास पुढाकार घेणाऱ्या अजितदादांच्या अशा अकाली जाण्याने खूप दुःख झाल्याचे यावेळी मा.आयुक्त महोदयांनी सांगितले.